प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सांगली

दुरध्वनी क्रमांक - ०२३३-२३७२७१७ ई मेल - eoprisang@gmail.com

वाचले- १.मुख्याध्यापक, सिध्दार्थ पब्लिक स्कूल, जत ता. जत जि. सांगली यांचेकडील जा.क्र. ८९/२०२२-२३ दिनांक-२३/०१/२०२३ रोजीचे प्रस्तावानूसार

२.मा.अवर सचिव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग महाराष्ट शासन यांचे कडील क्र. NOC 2009/(19/09) SE-1 दिनांक-२५/०३/२००९

३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र.नाहप्र २००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक-०७/०८/२००९

४.मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचे कडील क्र.नाहप्र/२०१३/(७५/१३)/माशि-०१ दिनांक-१९/६/२०१३

५.मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचे कडील क्र.नाहप्र/२०१३/(७५/१३)/माशि-०१ दिनांक-०२/८/२०१३.

६.या कार्यालयाचे मंजुर टिप्पणी दिनांक- / /२०२३

***************************************************************************************

जा.क्रं.जिपसां/प्राशिवि/आस्था-१०/ 13442 /२०२३ दिनांक- 07/ 08 /२०२३

**प्रथम मान्यता आदेश :-**

उपरोक्त वाचा क्रमांक १ ते ४ अन्वये श्री. उमाजीराव सनमडीकर मेडिकल फौंडेशन, जत ता. जत जि. सांगली संचलित या संस्थेने सन २००९-१० पासून सिध्दार्थ पब्लिक स्कूल, जत ता. जत जि. सांगली इंग्रजी माध्यम (CBSE) या नावाने इ. १ ली ते इ. ८ वी करिता शाळा सन २००९-१० पासून सुरु केलेली आहे.सदर शाळेस खालील अटी व शर्तीस अधिन राहून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

१.शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.शासनाने ज्या ठिकाणी शाळेस परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजणेत येईल.

३.शासन परवानगी आदेशामध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे;त्या वर्गाव्यतिरीक्त इतर वर्ग सरु करता येणार नाहीत.

४.परवानगी मिळाल्यापासून १८ महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु केलेली नाही,असे निदर्शनास आल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

५.महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांचे अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

६.नविन/दर्जावाढ शाळेमध्ये शासन निर्णय दिनांक-२९/६/२०१३ नुसार भौतिक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील या शाळेच्या संदर्भात आर.टी.ई ॲक्ट २००९ मध्ये नमुद केलेल्या सर्व मानकांची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

७.शाळेमध्ये आकारणेत येणारे शैक्षणिक शुल्क शासनाचे प्रचलित नियम तसेच वेळोवेळी होणाऱ्या सुधारीत शासन नियमानूसार आकारणेत यावे. तथापी सदरचे शैक्षणिक शुल्क अवाजवी असू नये.नियमबाह्य शुल्क आकारणी केलेस योग्य ती कारवाई करणेत येईल.

८.शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

९.अधिनियमातील तरतुदीनुसार संस्था वरील वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर चालविण्यास कायमपणे सक्षम असली पाहिजे. या वर्गाना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मंजुरी दिली असलेने भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत शासनाकडून देणेत येणार नाही.

१०.शासन निर्णय दिनांक-३/११/२००९ नुसार व मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शाळेची इमारत नॅशनल बिल्डिंग कोडनुसार असणे आवश्यक आहे.

११.सदरची प्रथम मान्यता आपण सादर केलेल्या कागपत्रांच्या आधारे देण्यात येत असुन,भविष्यात सदर कागदपत्रे खोटी अथवा चुकीचे आढळल्यास आपली प्रथम मान्यता रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१२.शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्ती नियमाच्या अधिन राहुन नेमला पाहीजे तसेच नियुक्त शिक्षक वर्गाची सक्षम प्राधिकाऱ्याकडुन मान्यता घेतली पाहीजे.तसेच सदर कर्मचा-यांचे वेतन व भत्ते नियमानुसार संस्थेने दिले पाहीजे.

१३.मा.अवर सचिव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग महाराष्ट शासन यांचे NOC आदेशातील सर्व अटी व शर्तीची पुर्तता होण्याच्या अधिन राहून प्रथम मान्यता देणेत येत आहे..

(मोहन गायकवाड)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद सांगली

**प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी**

१.अध्यक्ष / सचिव, श्री. उमाजीराव सनमडीकर मेडिकल फौंडेशन, जत ता. जत जि. सांगली

२.मुख्याध्यापक, सिध्दार्थ पब्लिक स्कूल, जत ता. जत जि. सांगली.